



दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com


**आजचा सुविचार**

स्वतःला कधीही कमी लेखू नका;
तुमच्या आत्मविश्वासाने
अशक्य गोष्टी सुद्धा
शक्य होऊ शकतात.


वर्ष : ०५ | अंक : १११, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.०४ डिसेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# निवडणूक निकालाबाबतचा कोर्टाचा निर्णय संविधानाच्या विरोधात?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०३, पुणे :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा निकाल आता २१ डिसेंबर रोजी जाहीर होणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने हा निर्णय दिला आहे. यामुळे २० डिसेंबरपर्यंत आचारसंहिता लागू राहणार आहे. या निर्णयावर वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी नाराजी व्यक्त केली आहे. तसेच त्यांनी काही महत्वपूर्ण प्रश्नही उपस्थित केले आहेत.

नागपूर हायकोर्टाने नगरपरिषद निवडणुकीसंबंधी दिलेला निर्णय पूर्णपणे चुकीचा असून, संविधानानुसार निवडणूक प्रक्रियेत कोणत्याही कोर्टाला हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही, असा सवाल वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी उपस्थित केला आहे. गेल्या आठवड्यात सुप्रीम कोर्टानेही निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेप करण्यास नकार दिला असताना, हायकोर्टाने हा निर्णय कसा दिला, यावर त्यांनी प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. चिन्ह वाटपाबाबत केवळ जिल्हा स्तरावरील कोर्टाला सुनावणीचा अधिकार आहे, हायकोर्टाला तोही नाही, असे आंबेडकर म्हणाले. निवडणूक आयोगाने जाहीर केलेला कार्यक्रम पुढे ढकलल्यामुळे नव्याने होणारी निवडणूक प्रक्रिया आणि



## प्रकाश आंबेडकरांचा थेट हल्लाबोल!

जुन्या प्रक्रियेतील गॅझेट प्रसिद्धी यात एकत्रीकरण कसे होणार, हा घटनात्मक पेचप्रसंग असून, यावर मुख्य न्यायमूर्तींनी लक्ष घालून थांबवलेली मतमोजणी पुन्हा सुरू करावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीने केली आहे.

राजकीय पक्षांनी तुरुंगात जाण्याची भीती बाळगू नये, असे आव्हानही त्यांनी दिले. निवडणूक जाहीर करण्याचा अधिकार केवळ निवडणूक आयोगाला आहे, त्यामुळे २१ तारखेच्या मतमोजणीला काहीच महत्त्व राहिलेले नाही. आयोगाने स्वतः कोर्टात जाऊन रद्द झालेली मतमोजणी पुन्हा सुरू करण्याची मागणी करावी, असेही ते म्हणाले.

याशिवाय प्रकाश आंबेडकरांनी देवेंद्र फडणवीसांवरही निशाणा साधला आहे. ते म्हणाले की, 'ईव्हीएम चीप कोठे बनवले जातात, हे मुख्यमंत्र्यांना विचारावे.' त्यामुळे प्रकाश आंबेडकरांनी नागपूर हायकोर्टाच्या नगरपरिषद निवडणुकीसंबंधीच्या निर्णयावर तीव्र आक्षेप घेतला आहे. त्यांच्या मते, हा निर्णय संविधानाच्या विरोधात आहे. निवडणूक प्रक्रिया सुरू झाल्यानंतर कोणत्याही कोर्टाला त्यात हस्तक्षेप करता येत नाही, हा संविधानाचा नियम आहे. गेल्या आठवड्यात सुप्रीम कोर्टानेही याच कारणास्तव निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेप करण्यास नकार दिला होता. तरीही नागपूर हायकोर्टाने असा निर्णय कसा दिला, हा प्रश्न आंबेडकर यांनी उपस्थित केला आहे.

## महाराष्ट्र 'राजभवन' झाले आता 'लोकभवन'




अक्षराज : जे. के. पोळ

दि.०३, मुंबई : केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार महाराष्ट्र राजभवनचे नाव आता अधिकृतपणे 'महाराष्ट्र लोकभवन' असे करण्यात आले आहे. महाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी या संदर्भात राजभवन सचिवालयाला निर्देश दिले आहेत. राजभवन अधिक लोकाभिमुख, पारदर्शक आणि लोक कल्याणासाठी समर्पित करण्याच्या उद्देशाने हा निर्णय दिशादर्शक आहे, असे राज्यपालांनी सांगितले.

'लोकभवन' म्हणून ओळखले जाणारे राजभवन आता केवळ राज्यपालांचे निवासस्थान व कार्यालय न राहता, राज्यातील नागरिक, समाजातील विविध घटक, विद्यार्थी, संशोधक, शेतकरी आणि नागरी संघटनांशी संवाद व सहभाग यांचे एक केंद्र व्हावे अशी अपेक्षा राज्यपालांनी व्यक्त केली.

'लोकभवन' हे सरकार आणि राज्यातील जनतेमध्ये सेवा, सहकार्य व संवादाचा सेतू व्हावे, हीच या नामांतरामागची भूमिका आहे, असे त्यांनी सांगितले.

'लोकभवन' केवळ संवैधानिक कर्तव्यांपुरते मर्यादित न राहता, समाजाच्या आशा, आकांक्षा आणि समस्यांप्रति संवेदनशील राहून त्यांच्याशी थेट नाते जपणारे खऱ्या अर्थाने लोकभवन असेल असे राज्यपालांनी स्पष्ट केले.

# जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या खात्यात ९३.७६ कोटींची थेट मदत !

## खा. प्रतिभा धानोरकर यांच्या पाठपुराव्यामुळे अतिवृष्टीची नुकसान भरपाई

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०३, चंद्रपूर :** जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने आणि भरीव आर्थिक मदत मिळावी यासाठी खा. प्रतिभा धानोरकर यांनी केंद्र आणि राज्य शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. याच प्रयत्नांचा भाग म्हणून हिवाळी अधिवेशनात लोकसभेत (तारांकित प्रश्न क्र. ३३) त्यांनी हा गंभीर मुद्दा अत्यंत प्रभावीपणे मांडला. त्यांच्या या निर्णायक 'आवाजा' ला मोठे यश मिळाले असून, केंद्र सरकारने दिलेल्या लेखी उत्तरात चंद्रपूर जिल्ह्यासाठी ९३.७६ कोटी रुपयांची नुकसान भरपाई जाहीर केली आहे.

या महत्वपूर्ण मागणीमुळे चंद्रपूर जिल्ह्याच्या हजारो शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे. खा. प्रतिभा धानोरकर यांनी सरकारला अनेक महत्वपूर्ण प्रश्न विचारुन मदतीचा तपशील मागितला होता. त्यानी विशेषत्वाने सोयाबीन व्यतिरिक्त इतर पिकांचे झालेले गंभीर नुकसान, यामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांची नेमकी संख्या आणि त्यांना पिकांच्या नुकसानीची भरपाई म्हणून लवकरात लवकर पुरेसे आर्थियक सहाय्य उपलब्ध करण्यासाठी सरकारने उचललेली पाऊले यावर जोर दिला. याव्यतिरिक्त पंचनामा करताना मृदा अपरदन आणि संपूर्ण पीक हानी यासारख्या घटकांचा समावेश केला जात नसल्याच्या तक्रारीकडेही त्यांनी केंद्र सरकारचे लक्ष वेधले होते. खा. प्रतिभा धानोरकर यांच्या प्रश्नांना लेखी उत्तर देताना केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाने चंद्रपूर जिल्ह्यासाठीची मदत

स्पष्ट केली आहे. यात अतिवृष्टीमुळे बाधित सर्व पिकांसाठी दिल्हाला



९,३७६.५६ लाख रुपये नुकसानभरपाई देण्यात आली आहे. याव्यतिरिक्त, रब्बी पिकांसाठी सर्व बाधित शेतकऱ्यांकरीता ११,०३०. ९४ लाख रुपयांची अतिरिक्त विशेष सहाय्यता देखील जारी करण्यात आली आहे. मदत वितरणाच्या सद्यस्थितीबद्दल सांगायचे झाल्यास २४ नोव्हेंबर २०२५ पर्यंत 'ई-पंचनामा पेमेंट वितरण पोर्टल' च्या माध्यमातून १,१३, ४५५ बाधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट ८२,३७,५०.०४८ रुपयांची रक्कम हस्तांतरित झाली आहे. ज्यामुळे शेतकऱ्यांना त्वरीत दिलासा मिळाला आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी मंजूर झालेल्या निधीपैकी केंद्राच्या हिश्श्याचे १५६६.४० कोटी रुपये राज्याला वर्ग करण्यात आले आहेत. पूरस्थितीच्या नुकसानीचा आढावा घेण्यासाठी आंतर मंत्रालयी केंद्रीय पथकाने ३ ते ५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत बाधित क्षेत्रांचा दौरा केला होता. पंचनामा प्रणालीबाबतच्या तक्रारींवर, महाराष्ट्र सरकारने अशी कोणतीही तक्रार प्राप्त झाली नसल्याचे केंद्राला कळवले आहे. एकंदरीत, खा. प्रतिभा धानोरकर यांनी शेतकऱ्यांची बाजू लावून धरल्यामुळेच चंद्रपूरच्या शेतकऱ्यांना हा महत्वपूर्ण आणि त्वरित आर्थिक लाभ मिळाला आहे.




# डोळखांब प्राथमिक आरोग्य केंद्राची दुरवस्था !

## धक्कादायक बॅटरीच्या उजेडात महिलेची प्रसूती, डोळखांब प्राथमिक आरोग्य केंद्रातील प्रकार

**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.०३, शहापूर (ठाणे) :** शहापूर तालुक्यापासून ३० किमी अंतरावर असलेल्या आदिवासी दुर्गम अशा डोळखांब भागात दिवसेंदिवस वाढत चाललेला कुपोषणाचा आकडा कमी होण्याचे नाव घेत नाही. अशातच १९८२-८३ साली येथे झालेली इमारत २७ महसुली गावे ६० गावपाड्यांच्या आरोग्याची काळजी घेणार्या येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे सोयी सुविधांअभावी तीनतेरा वाजले आहेत. वाढती लोकसंख्या, जीर्ण इमारत, विजेची समस्या, रिक्त पदे, लोकसंख्येचा विचार करता अपुरी व्यवस्था, कर्मचार्यांसाठी असलेली गळकी, नादुरुस्त निवासस्थाने, विजेची व पाण्याची समस्या, अपुरा कर्मचारी वर्ग आदी समस्यांनी हे रुग्णालय ग्रासले आहे.

डोळखांब प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत ग्राम पातळीवर आरोग्य सेवा पुरविण्यासाठी खराडे, गुंडे, डेहणे, साकडबाव, चोंढे आणि डोळखांब या दुर्गम भागात उपकेंद्र सुरू करण्यात आले आहे. मात्र डोळखांब आरोग्य केंद्र सोडले तर इतर ठिकाणी निवासस्थानाच्या समस्येमुळे कोणताही कर्मचारी वास्तव्य करत असलेला दिसून येत नाही.

**१) आरोग्य केंद्रात विजेची समस्या**




विजेसाठी बसविलेल्या सौर ऊर्जेवर चालणार्या यंत्रातील बॅटरी खराब झाल्याने वीज गेल्यास येथील रुग्णांना आणि कर्मचार्यांना अंधारात राहावे लागते. दिवाळीच्या काळात म्हणजेच काही महिन्यांपूर्वी अवकाळी पावसामुळे व वादळी वाऱ्यामुळे परिसरातील वीजपुरवठा खंडित झाला होता.

त्याच वेळी रुग्णालयात एका आदिवासी महिलेची प्रस्तुती सुरू असतांना अचानक वीज पुरवठा खंडित झाल्याने. त्यावेळी मेणबत्ती व मोबाईल टॉर्चच्या उजेडात आदिवासी महिलेची प्रसूती करण्याची वेळ डॉक्टरांवर आली होती. त्यामुळे या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीच्या काळात येथे पर्यायी वीज, सौर ऊर्जेवर चालणार्या बॅटर्या उपलब्ध करून देण्याची गरज आहे.

**२) ॲम्ब्युलन्सची दुरवस्था...**

आरोग्य केंद्रात असणारी १०८ क्रमांकाची ॲम्ब्युलन्स ही वर्षातून काही महिने बंद असते, तर कधी कधी नादुरुस्त अवस्थेत असते. त्यामुळे तातडीच्या वेळी रुग्णांना १०२ किंवा खाजगी वाहनाचा आधार घ्यावा लागतो.

**३) पाण्याची समस्या...**

डोळखांब प्राथमिक आरोग्य केंद्राला ७-८ वर्षापूर्वी पाणी योजना मंजूर झाली होती. परंतु ठेकेदाराने हे काम अपूर्ण ठेवले. तसेच तीन फेज जोडणीचे कामही झाले नसल्यामुळे पाण्याची कमतरता आहे. सद्यस्थितीत ग्रामपंचायतीने तात्पुरती स्वरूपात पाण्याची उपलब्धता करून दिली असली तरी रुग्णालयाच्या मालकीची योजना कधी सुरू होणार असा सवाल विचारला जात आहे. नुकतीच तीन फेज वीज जोडणी आरोग्य केंद्राला मिळाली आहे. परंतु टाकीचे काम पूर्ण न झाल्याने सध्या तरी पाण्याची व्यवस्था होण्याची चिन्हे दिसत नाही.

**४) उपकेंद्राची दुरवस्था आणि रिक्त पदे**

प्राथमिक आरोग्य केंद्रातर्गत येणार्या सहा उपकेंद्रापैकी साकडबाव, डेहणे या ठिकाणी संरक्षक भिंत नाही, तर चोंढे येथे वीज फिटिंग, नळ जोडणी नसल्याने विहिरीवरून पाणी भरावे लागते, तर इतर उपकेंद्रातील निवासस्थानांची दुरवस्था झाली आहे.

## संपादकीय


### भारतीय नौदल दिन

आज भारतीय नौदल दिन. भारतीय नौदलातर्फे दरवर्षी ४ डिसेंबर हा दिवस भारतीय नौदल दिन म्हणून साजरा केला जातो. त्याआधीचा पूर्ण सप्ताह हा देशभरात नौदल सप्ताह म्हणून साजरा केला जातो. ४ डिसेंबर याच दिवशी नौदलदिन का साजरा केला जातो हे जाणून घेऊया. १९७१ सालच्या सुरवातीपासूनच भारत आणि पाकिस्तानमध्ये कमालीचा तणाव निर्माण झाला होता. तत्कालीन पूर्व पाकिस्तान मधून पाकिस्तानी हवाईदल सातत्याने भारतीय हद्दीत घुसखोरी करत होते. भारताने अनेकदा इशारे देऊनही पाकिस्तान आपली खोड मोडायला तयार नव्हते. १९७१ च्या एप्रिल महिन्याच्या सुमारासच युद्ध पुकारण्यासदृश परिस्थिती निर्माण झाली होती. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी या पार्श्वभूमीवर सैन्य दलांच्या अधिकाऱ्यांची बैठक बोलावली या बैठकीला मंत्रिमंडळातील सर्व सदस्य उपस्थित होते. लष्करप्रमुख सॅम माणेकशॉ यांनी या बैठकीत स्पष्ट सांगितले की सध्याची परिस्थिती आणि ऋतू हे आपल्यासाठी अनुकूल नसल्याने सध्यस्थितीत युद्ध आपल्याला परवडणारे नाही. युद्धासाठी नोव्हेंबर पर्यंत थांबावे लागेल. नोव्हेंबर पर्यंत सैन्याची जुळवाजुळव व्यवस्थित करता येईल याची खात्री देण्यासही ते विसरले नाही. खरंतर एप्रिलमध्येच युद्ध व्हावे या मताच्या इंदिरा गांधी होत्या पण लष्करप्रमुखांनी परिस्थिती विषद केल्यानंतर नोव्हेंबर पर्यंत थांबण्याचा निर्णय पंतप्रधान आणि मंत्रिमंडळाने घेतला. त्यामुळे आपण काहीही केले तरी भारत आपल्याला उलट उत्तर देऊ शकणार नाही अशा आविर्भावात पाकिस्तान वावरू लागला. त्यांनी ३ डिसेंबर रोजी भारतीय सीमाभागावर पूर्व आणि पश्चिम पाकिस्तानातून जोरदार हल्ले चढवले. त्याचवेळी भारतीय विमानवाहक युद्धनौका आयएनएस विक्रांतला सागरतळात बुडवण्याची योजना पाकिस्तानने आखली. पाकिस्तानची ही योजना भारतीय नौदलाच्या लक्षात आल्याने भारतीय नौदलाने चुकीचा संदेश पाठवून पीएनएस गाझी ची दिशाभूल केली आणि डाव साधला. भारतीय नौदलाने चढवलेल्या हल्ल्यात गाझी या पाकिस्तानच्या पाणबुडीला जलसमाधी मिळाली. भारताच्या आयएनएस विक्रांतला सागर तळाशी पाठवण्याची स्वप्ने पाहणाऱ्या पाकिस्तानी नौदलाची सर्वात शक्तिशाली असलेली गाझी ही पाणबुडीच सागर तळाशी पोहचल्याने पाकिस्तानला मोठा धक्का बसला. गाझी पाणबुडीला जलसमाधी मिळाल्यानंतर बंगालच्या उपसागरात आयएनएस विक्रांतने आपला दरारा पसरवला आणि पाकिस्तानी नौदलाचे कंबरडे मोडून काढले. आयएनएस विक्रांतवरील धावपट्टीचा वापर करत नौदलाच्या लढाऊ विमानांनी हल्ला चढवून पूर्वेकडे पाकिस्तानला डोकेही वर काढू दिले नाही. हे सुरू असतानाच पश्चिमी मुख्यालयाच्या नौदल ताफ्याने धाडसी नियोजन करुन लहान आकाराच्या नौकांच्या मदतीने छुप्या पद्धतीने पाकिस्तानी सागरी हद्दीत प्रवेश करत थेट कराची बंदरावरच हल्ला चढवला. पाकिस्तानी युद्धनौका, पाणबुड्या त्यांच्यावरील या अचानक झालेल्या हल्ल्याने हादरुन गेल्या. कराची बंदरावर थेट हल्ला होऊ शकतो, याची कल्पनाच पाकिस्तानी नौदलाने केली नव्हती. ३ व ४ डिसेंबरच्या मध्यरात्री भारतीय नौदलाने केलेल्या या हल्ल्याने पाकिस्तानचे कंबरडे मोडले आणि युद्धाचे पारडे भारताच्या बाजूने झुकले. त्यानंतर दहा दिवसांतच पाकिस्तानने शरणागती पत्करली. नौदलाच्या या पराक्रमाची आठवण म्हणून ४ डिसेंबर हा दिवस नौदल दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानंतर भारतीय नौदलाचा जगभरात दबदबा निर्माण झाला. अरबी समुद्र, बंगालचा उपसागर आणि दक्षिण महासागरात भारतीय नौदलाचे सामर्थ्य निर्माण झाले. आज भारतीय नौदल हे जगातील सर्वाधिक शक्तिशाली नौदल म्हणून ओळखले जाते. आज भारताचे नौदल हे जगातील पाचव्या क्रमांकाचे नौदल आहे. भारतीय नौदलाकडे एकूण ५५ युद्धनौका आणि ५८ हजार ३५० सैनिक आहेत. भारताकडे ९ विध्वंसक, १५ नौका, न्यूक्लिअर हल्ला करणारी एक पाणबुडी, १४ पारंपरिक पाणबुडीसह आधुनिक शस्त्रे आहेत म्हणूनच जगातील सर्वात शक्तिशाली नौदलामध्ये भारतीय नौदलाची गणना होते. भारतीय नौदलाला नौदल दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**– श्याम बसप्पा ठाणेदार**

# मानव कल्याणार्थ श्री दत्त माऊलींचा गुरुपदेश

आपण या पृथ्वीतलावर जीवन जगतो.आपल्या अवती-भवती अनेक छोटे मोठे प्राणी वास्तव्यास आहेत.कि जे ईशरचित कार्य अगदी तंतोतंत पार पाडतात.त्याच्या दैनंदिन जीवन शैलीकडे बघितल्यास हेवा वाटतो म्हणून आपण त्या सजीव-निर्जीव गोष्टींची उपमा देऊन मानवांनी पण त्यांच्यासारखं वागावं असं सहज आपल्या बोलीभाषेतून बोलत असतो.किंवा त्याचा दाखला देत असतो.माणूस म्हणून आपल्या वैयक्तिक स्वाथापायी कदाचित कुठेतरी काही अंशी चुकतांना दिसून येतो.मात्र या सृष्टीतील असे अनेक घटक आहेत कि,त्यांच्याकडूनच आपल्यालाच जणू काही शिकायला मिळतं.किंवा त्याच्यासारखं आपणही वागावं त्यातून या समस्त पृथ्वीतलावरील प्राणी मात्र गुण्या गोविंदाने नांदतील.यासाठी श्री दत्त महाराजांनी याच आपल्या अवतीभवती असलेल्या २४ सजीव-निर्जीव घटकांना गुरुस्थानी मानून मानव कल्याणार्थ उपदेश केला त्यापैकी प्रथम म्हणजे गुरु पृथ्वी. मनुष्याने पृथ्वीप्रमाणे सहनशील आणि द्वंद्वसहिष्णू असावे.जीवनात कितीही संकटे येवोत स्थिर संयम ढळता कामा नये.दुसरे गुरु वायू.सुमन गंध वेचणें । दशदिशास वाटणें ।अनिल-नीती मधुरतरा । मानवे न तुज कशी ।।अर्थात वारा सुगंधी फुलावरून वहातांना सुगंधाने आसक्त होऊन तो तेथे थांबत नाही,त्याचप्रमाणे या भौतिक गोष्टीमध्ये अथवा द्रव्यासारख्या वस्तूला मोहित होऊन आपण आपले व्यवहार थांबवू नये.श्री गुरुदेव दत्तानी मानलेले तिसरे गुरु म्हणजे आकाश.आत्मा हा आकाशाप्रमाणे सर्व चराचर वस्तूंनी व्यापून राहिला आहे, तरी निर्विकार,एक,सर्वांशी समत्व राखणारा,निःसंग,अभेद, निर्मळ, निर्वैर, अलिप्त आणि अचल आहे.त्याप्रमाणे जीवन व्यथित करावे.हृदय आकाशा प्रमाणे विशाल असावे.श्री दत्तमाऊलींनी मानलेले चवथे गुरु पाणी.मनुष्याने पाण्याप्रमाणे सर्वांसमवेत स्नेहभावाने वागावे. कोणाचाही पक्षपात करू नये.पाणी मधुर असते, ते मनुष्याची तहान शांत करते. त्याप्रमाणे ज्ञानतृष्णा पूर्ण करावी.दत्त माऊलीनींसांगितलेले पाचवे गुरु अग्नि.मनुष्याने अग्नीप्रमाणे तप करून प्रकाशित व्हावे. जीवनात कष्ट, मेहनत संघर्ष करावा. आणि त्यातून जे मिळेल ते भक्षण करून कोणत्याही दोषांचे आचरण न करता आपले गुण कार्यकारणप्रसंगीच योग्य ठिकाणी वापरावे.दत्त माऊलिंनी सांगितलेले सहावे गुरु म्हणजे चंद्र.अमावास्येची सूक्ष्म कला आणि पंधरवड्याच्या पंधरा कला मिळून चंद्राच्या सोळा कला मोजण्यात



येतात.ज्याप्रमाणे चंद्राच्या कलेत उणे-अधिकपणा असून त्याचा विकार चंद्रास बाधक होत नाही,तद्वत् आत्म्यास देहासंबंधीचे विकार बाधक होत नाहीत. म्हणून मनाची स्थिरता कायम ठेवावी.सातवे गुरु सूर्य. सूर्य भविष्यकालाचा विचार करून जलाचा संचय करतो आणि योग्य काळी परोपकारार्थ त्याचा भूमीवर वर्षाव करतो. त्याप्रमाणे मनुष्याने उपयुक्त वस्तूंचा संचय करून, देश, काल, वर्तमानस्थिती लक्षात आणून निष्पक्षपातीपणाने सर्व प्राण्यांस त्यांचा लाभ द्यावा पण त्याचा अभिमान बाळगू नये.माऊलींनी सांगितलेलेला आठवा गुरु कपोत अर्थात कबुतर.जसा बहिरीससाणा कपोताला (कबुतराला) परिवारासहित भक्षण करतो,तसे जो मनुष्य स्त्री-पुत्रादिकांचे ठायी आसक्त राहून संसार सुखमय मानून वागतो,त्याला काळ भक्षण करतो. यास्तव मुमुक्षूने या सर्वांपासून मनाने अलिप्त असावे.असा मोलाची शिकवण कापोत आपणास देते असा दत्त गुरुमाऊलीनी आपणांस उपदेश केला.

श्री दत्तमाऊलींनी मानलेला नववा गुरु म्हणजे अजगर.जसा अजगर मनात भय न बाळगता प्रारब्धावर विश्वास ठेवून एका ठिकाणी पडून रहातो आणि ज्या ज्या वेळी जे जे मिळेल ते ते भक्षण करून संतोष पावतो, त्यात अल्प-अधिक किंवा कडू-गोड असा विचार करत नाही, काही काळ खावयास मुळीच मिळाले नाही, तरी घाबरत नाही आणि अंगात शक्ती असतांनाही तिचा उपयोग करावयास जात नाही,त्याचप्रमाणे मानवांनी प्रारब्धावर विश्वास ठेवून अल्पस्वल्प जे काही मिळेल, ते भक्षण करून, प्रसंगी काही मिळाले नाही, तरी स्वस्वरूपी लय लावून बसावे.याचा अर्थ असा नाही कि मानवाने प्रयत्न करने सोडावे सतत प्रयत्नशिल रहावे. दहावे गुरु समुद्र. समुद्र जसा वर्षाकालात अनेक नद्यांनी अपरिमित जल आणल्यास सुखी होत नाही किंवा न आणल्यास दुःखी होत नाही त्याप्रमाणे प्रत्येक मनुष्याने स्वधर्माधीन राहून सुखोपभोगांचा लाभ झाल्याने सुखी होऊ नये किंवा दुःख कोसळल्याने दुःखी होऊ नये,सदैव आनंदभरित असावे.अकरावे गुरु पतंग.पेटवलेल्या दिव्याचे विस्तारलेले मोहक तेज पाहून पतंग मोहित होतो आणि त्यावर झडप घालून जळून मरतो. तयाचप्रमाणे जो मनुष्य स्त्रीविलासाकरता,स्त्रीची लावण्यता आणि युवावस्था पाहून मोहित होतो,तो पतंगाप्रमाणे आपला नाश करून घेतो.तर मोहात अडकू नये अशी मोलाचा उपदेश दत्त माऊली आपणांस करत आहे.बारावे गुरु मधमाशी आणि मधुहा. त्यापैकी मधमाशी ही पुष्कळ कष्ट करून अडचणीच्या ठिकाणी,उंच वृक्षावर पोळे बनवून त्यात मध साठवते.तो ती स्वतःही खात नाही आणि दुसर्या कोणास खाऊ देत नाही.शेवटी मध जमा करणारे मधुहा अचानक येऊन, तिचा प्राण घेऊन पोळ्यासह मध घेऊन जातात. त्याप्रमाणे जो कृपण महत्प्रयत्न करून द्रव्यार्जन करून त्याचा संग्रह करतो, तो ते द्रव्य अग्नी, चोर किंवा राजा यांनी एकाएकी हरण करून नेल्यामुळे शेवटी दुःख पावतो किंवा त्यास अनीतीमान संतती प्राप्त होऊन ती त्या द्रव्याचा अपव्यय करते किंवा तो निपुत्रिक मरण पावतो. याप्रमाणे तो कालवश झाल्यावर ते द्रव्य जेथल्या तेथे रहाते अगर भलत्याला प्राप्त होते. मरते वेळी त्याची त्या द्रव्यावर इच्छा राहिल्यास तो पिशाच किंवा सर्प होऊन ते द्रव्य वापरणार्याला उपद्रव देतो. याप्रमाणे धनसंचय केल्यामुळे अचानक मरणाची प्राप्ती होते, हा उपदेश मधमाशीपासून घेऊन द्रव्यसंचय करण्याचे सोडून द्यावे.त्याच प्रमाणे मधुहा. ज्याप्रमाणे मधुहा काही उद्योग केल्यावाचून मधाची प्राप्ती करून घेतो, त्याचप्रमाणे साधक पुरुषाने चूल, भांडीकुंडी,अग्नी,लाकूड इत्यादी जमवाजमव करण्याची खटपट न करता गृहस्थाश्रम्याच्या घरचे सुसज्ज अन्न मिळवून भक्षण करावे आणि ईश्वरप्राप्तीच्या उद्योगाकडे त्या वेळेचा उपयोग करावा.तेरावा गुरु गजेंद्र अर्थात हत्ती.हत्ती बलवान असला, तरी त्यास वश करण्यासाठी माणसे भूमीत खड्डा खणून त्यावर गवत पसरतात.त्यावर काष्ठाची एक हत्तीण करून तिला गजचर्म पांघरतात आणि त्या खड्ड्यावर उभी करतात.तिला पाहून हत्ती विषयसुखलालसेने लुब्ध होऊन शीघ्र गतीने त्या काष्ठाच्या हत्तिणीसन्निध येतो आणि त्या खड्ड्यात पडतो. त्यामुळे सहजी मनुष्याच्या हातात सापडतो. त्याप्रमाणे जो पुरुष स्त्रीसुखास भुलतो,तो त्वरित बंधनात येऊन पडतो. म्हणून मनाचं स्थैर्य ढळू देऊ नका असा मोलाचा उपदेश दत्त माऊलीआपणांस करत आहे.

श्री दत्त महाराजांनी सांगितलेला चौदावा गुरु म्हणजे भ्रमर.कमळे सूर्य मावळताच मिटतात. अशा वेळी भ्रमर त्यावर आरूढ असला म्हणजे कमळाच्या पोटात बंधन पावतो. यावरून 'विषयासक्तीने बंधन प्राप्त होते', हे जाणून विषयांत आसक्ती बाळगू नये.पंधरावा गुरु मृग.पवनाप्रमाणे गती असलेला हा मृग जो कोणाच्याही हाती लागत नाही,मात्र कस्तुरीमृग मधुर गायनाला लुब्ध होऊन आपला प्राण परस्वाधीन करतो.व जीवनाचा नाश करून घेतो.हे लक्षात ठेवून कोणत्याही मोहात अडकू नये.सोळावा गुरु मत्स्य.लोखंडाच्या गळाला मांस बांधून पाण्यात सोडल्यावर ते मांस पाहून भुलल्यामुळे मत्स्य तो गळ गिळतात आणि गळ तोंडात अडकल्यामुळे प्राणास मुकतात. त्याप्रमाणे मनुष्य जिव्हेच्या स्वादात बद्ध झाल्यानेजन्म-मरणरूपी भोवर्यात गोते खात रहातो.

सतरावा गुरु पिंगला वेश्या.एके रात्री बराच काळ वाट पाहूनही एकही पुरुष पिंगला वेश्येकडे आला नाही.वाट बघून आणि आशेने एकसारखे आत-बाहेर येऊन ती कंटाळली आणि तिला अचानक वैराग्य आले.जोपर्यंत मनुष्याच्या अंगी आशा प्रबल असते,तोपर्यंत त्याला सुखनिद्रा लागत नाही.त्याचप्रमाणे पुरुषाने आशेचा त्याग केला,त्याला या संसारात एकही दुःख बाधत नाही.अठरावा गुरु टिटवी.एकदा एक टिटवी चोचीत मासा धरून चालली आहे, हे पाहून शेकडो कावळे आणि घारी तिच्या मागे लागले आणि तिला टोचा मारून, हतबल करून तो मासा हिसकावून घेण्याचा प्रयत्न करू लागले. ती जिथे जिथे जाई, तिथे तिथे हे सैन्य तिचा पाठलाग करी. शेवटी 'दे माय धरणी ठाय' होऊन तिने एकदाचा तो मासा टाकून दिला. तोच एका घारीने त्याला पकडले. हे बघण्याचाच उशीर, टिटवीला सोडून सारे कावळे आणि घारी त्या मासा उचलणार्या घारीचा पिच्छा पुरवू लागले. त्यामुळे ती टिटवी निश्चिंत होऊन एका झाडाच्या फांदीवर जाऊन शांतपणे बसली.या संसारात उपाधी झुगारून देण्यातच शांती आहे असा मोलाचा उपदेश दत्त महाराज आपणांस करतात. एकोणीसावा गुरु म्हणजे बालक.मानापमानाचा विचार न करता संपूर्ण जगतास प्रारब्धाधीन समजून,सर्व चिंतेचा परिहार करून बालकाप्रमाणे रहावे आणि आनंद भोगावा.विसावे गुरु म्हणजे कंकण.दोन कंकणे अर्थात बांगड्या एकावर एक आपटून त्यांचा आवाज होतो. अनेक कंकणे असली,तर जास्त आवाज होतो. त्याप्रमाणे दोन माणसे एकत्र राहिल्यास वार्तालाप होतो आणि ज्या ठिकाणी पुष्कळ माणसे एकत्र वास करत असतील तेथे कलह होतो.म्हणून लोकांता पेक्षा एकांतावर भर दयावा. त्यामुळे वाद विवाद टळतात. एकविसावा गुरु शरकर्ताअर्थात कारागीर. एके दिवशी एक कारागीर एकाग्र चित्ताने बाणाचे पाते सिद्ध करत बसला होता.त्याच्याजवळून राजाची स्वारी वाजतगाजत थाटात गेली.मागाहून एक मनुष्य आला आणि त्याने त्याला विचारले,''या वाटेने राजाची स्वारी गेली, तिचे तुम्ही अवलोकन केले काय ?'' त्यावर कारागीर उत्तरला, ''मी आपल्या कामात गर्क असल्यामुळे मला ते कळले नाही.'' या कारागिराप्रमाणे मानवाने आपली सर्व इंद्रिये ईश्वराच्या ठिकाणी लीन करून ध्यान धरावे.असा मोलाचा उपदेश दत्त महाराज आपल्याला करत आहे.

दत्त महाराजांनी मानव हितासाठी गुरुस्थानी मानलेला बाविसावा गुरु म्हणजे सर्प.दोन सर्प कधीही एकत्र रहात नाहीत किंवा समागमे फिरत नाहीत.ते आवाज न करता सावधपणे फिरतात, आपल्याकरता रहाण्यास घर न करता वाटेल त्याच्या घरात जाऊन रहातात.ते उघड रितीने फिरत नाहीत,प्रमाद अर्थात दोष नसता निंदाही करत नाहीत आणि अपकार केल्यावाचून कोणावर कोप करत नाहीत.त्याप्रमाणे दोन बुद्धीमंतांनी कधी एकत्र फिरू नये आल्यास परिमित भाषण करावे,कोणाशी भांडण-तंटा करू नये,विचाराने वागावे.असा उपदेश दत्त महाराज आपणांस करत आहे.तेविसावा गुरु कोळी अर्थात कांतीण.कोळी आपल्या नाभीतून तंतू काढून त्यांचे घर बनवतो आणि त्यात अहोरात्र क्रीडा करतो. पुढे मनास वाटेल, तेव्हा पुन्हा त्या घरास गिळून कोळी स्वतंत्र होतो. तसाच ईश्वर इच्छामात्रेकरून जग उत्पन्न करून त्याच्याशी नाना खेळ करतो आणि मनास येईल, तेव्हा त्याचा इच्छामात्रेच नाश करून आपण एकटा रहातो. जसा कोळी पुनःपुन्हा तंतू काढून घर करू शकतो, त्याप्रमाणे ईश्वर इच्छामात्रे चराचर जग उत्पन्न करून त्याचा आपल्याच अंगी लय करून पुन्हा मनास येईल,तेव्हा पूर्ववत ते निर्माण करतो.अर्थात कर्ता-करविता तो परमेश्वर आहे.दत्त महाराजांनी सांगितलेला चोवीसवा गुरु पेशकार अर्थात भ्रमरकीट त्याचप्रमाणे त्याला कुंभारीणमाशी असेही म्हणतात. विवेकचूडामणि,या ग्रंथा मध्ये ३५८ श्लोकात म्हटले आहे,सति सक्तो नरो याति सद्भावं ह्येकनिष्ठया ।

कीटको भ्रमरं ध्यायन् भ्रमरत्वाय कल्पते ।।

अर्थात भ्रमराचे ध्यान करणारा किडा जसा स्वतः भ्रमरपणाला पावतो तद्वत् एकनिष्ठपणाने परमात्वतत्वाचे चिंतन करणारा योगी परमात्मरूपास पावतो.थोडक्यात असे कि, जो प्राणी सदैव ज्याचे ध्यान करतो, तो त्या ध्यानामुळे परिणामी तदाकार होऊन जातो. कुंभारीणमाशी मातीचे घर करून त्यात एक किडा आणून ठेवते आणि त्यास वरचेवर येऊन फुंकर मारत रहाते. त्यामुळे त्या किड्याला माशीचे ध्यान लागून रहाते आणि तो शेवटी कुंभारीणमाशी बनतो.त्याप्रमाणे मानवाने गुरूपदिष्ट मार्गाने ईश्वराचे ध्यान धरावे, म्हणजे तो ईश्वरस्वरूप होतो.

अश्या प्रकारे श्री दत्त महाराजांनी भ्रमणकाळी आपल्या सूक्ष्म निरक्षणातून आपल्याच भोवतालच्या सजीव निर्जीव घटकांना गुरस्थानी मानून त्यांची आचरण पद्धती मानव प्राण्याच्या कल्याणासाठी कशी उपयुक्त आहे. याचा बहुमुल्य उपदेश केला आहे.

**श्री दत्त-जयंतीच्या हार्दिक शुभेच्छा.**

**- श्री.विनोद शेनफड जाधव -**
**मासरूळ ता.जि.बुलडाणा**
**मो.नं. ९७६३२८२०७७**

### दत्त जयंती

मनातली इच्छासुप्त
पूर्ण होता मन तृप्त
न मागता तूचि देशी
दुःख दर्द झाले गुप्त

कळे कसे न सांगता
तू सांग मजला फक्त
वाटून सारे तू विरक्त
म्हणून मी तुझाभक्त

षड्रिपु पिशाच्चभूत
प्राशती चांगले रक्त
बांधता भक्ती बंधना
झालोपूर्ण दुःखमुक्त

निराकार असूनि दत्त
कसा वेळोवेळ व्यक्त
मी इच्छिल्यापादुका
तू दिधलेअखखे तक्त

अवघे विश्व तुझेच हे
त्रयलोक प्रितिप्रयुक्त
वैराग्य मूर्ती साक्षात
राही कसा विनिर्मुक्त

भक्ती रमता आसक्त
दुःख वेदनातून मुक्त
चिंता कशी करू मी
आतां होता तवभक्त

नको संपत्ती अन्य रे
गुरु चरणा अतिरिक्त
स्वर्गाहून पावनस्थान
दिगंबरचरण सुप्रयुक्त

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

# भारतीय लोकशाहीतील निवडणुक प्रक्रिया अबाधित ठेवणे गरजेचे...

महाराष्ट्रात नुकताच नगरपालिका आणि नगर पंचायत निवडणुकीसाठी मतदान संपन्न झाले. मात्र राज्यांतील विविध भागांत मतदान प्रकियेला गालबोट लागल्याचे समोर आले आहे. कुठे सत्ताधारी आमदारांनी आचारसंहितेचे उल्लंघन केले तर कुठे राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींमध्ये जोरदार संघर्ष झाल्याचे पाहायला मिळाले. नाशिक, बुलढाणा, सोलापूर, मुक्ताईनगर, अंबरनाथ, बीड, गेवराई, महाड, रायगड, धाराशिव आदी ठिकाणी कार्यकर्त्यांमध्ये हमरीतुमरी तर राजकीय पक्षांचे कार्यकर्ते एकमेकांना भिडल्याने मतदानाला गालबोट लागल्याचे वृत्त आहे. मतदानाच्या दिवशी ठिकठिकाणी मतदान केंद्रावर उमेदवारांच्या कार्यकर्त्यांमध्ये बाचाबाची




झाली काही ठिकाणी एकमेकांवर जीवघेणा हल्ला देखिल केल्याचे समोर आले आहे. कुठे मशीन बंद पडली, यामूळे पुन्हा थोडा गोंधळ उडाला. या प्रकारामुळे पुन्हा एकदा कायदा आणि सुव्यवस्थेचा बोजवारा उडाल्याचे अधोरेखित झाले आहे. याचं पार्श्वभुमीवर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी असल्या वदांच्या घटनेमुळे दुःख आणि संताप व्यक्त केला असून अशा प्रकारचे वर्तन कदापी सहन केले जाणारं नसल्याचा इशारा दिला आहे. आपल्या भारतीय लोकशाहीमध्ये हिंसाचाराला थारा नाही निवडणूक हि पवित्र प्रक्रिया आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाला सुरक्षित आणि मुक्त वातावरणात, कोणाच्याही दबावाखाली न येता मतदानाचा मूलभूत हक्क बजावता आला पाहिजे तरचं खऱ्या अर्थाने लोकशाहीतील निवडणुकीला भारतीय राजकारणात असलेले महत्वाचे स्थान आबाधित राहील.

**- राजू जाधव,**
**मांगूर जि. बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## टाकळी ढोकेश्वर येथे दत्त जयंती उत्सव; सुश्राव्य हरीकीर्तनाचे आयोजन



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथे वै.ह.भ.प. योगिराज गुळवणी महाराज व वै. विठ्ठलबाबा पायमोडे यांच्या कृपाशीर्वादाने वै.ह.भ.प. गुरुवर्य बबन महाराज पायमोडे यांच्या प्रेरणेने डॉ. विष्णु पोळ व सिताराम खिलारी यांच्या मार्गदर्शनाने ५५ वर्षांपूर्वी सुरू केलेला दत्त जयंती उत्सव आजतागायत सुरू असून आदर्श गाव टाकळी ढोकेश्वर गावातील ग्रामस्थ, दत्त भजनी मंडळ यांनी एकत्र येऊन गुरवार दि.४ डिसेंबर रोजी गावातील दत्त मंदिरत हा दत्त जयंती उत्सव मोठ्या उत्साहात करण्यात येणार आहे. यावेळी भाविक व ग्रामस्थ यांच्या हस्ते सकाळी १० ते १२ वाजता दत्तगुरु यांचा अभिषेक व पूजा विधी सोहळा संपन्न होणार असून त्यानंतर दुपारी ४ ते सायंकाळी ६ वाजता हभप. लहू महाराज शिंदे (श्री. रंगदास स्वामी ईटकाई देशी वारकरी शिक्षण संस्था,आणे) यांचे सुश्राव्य हरिकीर्तन होईल. सायंकाळी ७ वाजता महाआरती त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यासाठी ग्रामस्थ व दत्त भजनी मंडळ प्रयत्नशील असून मोठ्या संख्येने भाविक या ठिकाणी दर्शनासाठी येत असतात. या दत्त जयंती उत्सवाचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन दत्त भजनी मंडळ व टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थ यांनी केले आहे. या दत्त मंदिराच्या कलर कामासाठी भाविकांनी सढळ हाताने मदत करावी असे आवाहन दत्त भजनी मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## बिबट नियंत्रणास मंजुरी द्या - खा.लंके; केंद्रीय मंत्री यादव यांना दिले पत्र



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, अहिल्यानगर :** नाशिक विभागात वाढता मानव विरूद्ध बिबट संघर्ष धोकादायक टप्प्यावर आहे. महाराष्ट्र शासनाने वैज्ञानिक पद्धतीने बिबटसंख्या नियंत्रण प्रस्ताव सादर केला. या प्रस्तावाला तातडीने 'मूलतत्त्व मंजुरी' द्यावी, या मागणीचे पत्र, खासदार निलेश लंके यांनी केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांना पाठवले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यासह अनेक भागात जंगलाऐवजी लोकवस्तीत बिबट्यांचा वावर वाढला आहे. शेती, मानवी वस्त्या व बागायती पट्ट्यात बिबट्यांचे वारंवार दर्शन होत आहे. त्यामुळे महिला, मजूर, शेतकरी आणि लहान मुलांवर गंभीर जीविताचा धोका निर्माण झाला आहे. गेल्या काही वर्षांत मृत्यू, जखमी होणे आणि पाळीव जनावरांच्या हल्ल्यांतही मोठी वाढ झाल्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षकांच्या अहवालात स्पष्ट आहे. परंपरागत उपाय निष्फळ ठरत असल्याने शासनाने वैज्ञानिक उपाय सुचविले आहेत. नर व मादी बिबट्यांवर सूक्ष्मछेदनाद्वारे कायमस्वरूपी जनन नियंत्रण, तसेच काही मादींवर औषधाधारित गर्भनिरोधकांची चाचणी अशा उपायांचे परीक्षण भारतीय वन्यजीव संस्था करणार आहे. संघर्षाची गंभीरता लक्षात घेता मंजुरीस विलंब करू नये. वन्यजीव संरक्षण अधिनियमाच्या कलमानुसार सविस्तर कार्ययोजनेला परवानगी द्यावी, असे लंके यांनी पत्रात स्पष्ट केले. ग्रामीण भागातील मजूर, महिला, मुले आणि जनावरांचे संरक्षण हा तातडीचा प्रश्न बनला आहे. केंद्राचा त्वरित हस्तक्षेप अपरिहार्य असल्याचे लंके यांनी नमूद केले.

## रोहित तायक्कांडो अकादमीच्या विद्यार्थ्यांनचा दबदबा



**अक्षराज : सुनिल साखरकर**

**दि.०३, मुंबई :** रॅडक्लिफ स्कूल (खारघर) तर्फे आयोजित करण्यात आलेल्या इंटर स्कूल तायक्कांडो स्पर्धे तपरेल - भोईवाडा येथील रोहित तायक्कांडो अकादमीच्या विद्यार्थ्यांनी ८ सुवर्ण, १० रोप्य आणि ११ कांस्य पदकाची कमाई करत अंडर १२ मध्ये पहिले पारितोषिक मिळविले आहे. सर्व स्तरातून विद्यार्थ्यांनचे कौतुक होत आहे.

**सुवर्ण पदक विजेते :-** तनिष्का शेलार, सान्वी बडंबे, श्रावणी पिंगळे, नेत्रा सुतार, सम्यक कासे, अरहंत सोनवणे, स्मित मोहिते, आदित्य अमराळे.

**रौप्य पदक विजेत :-** ध्रुवी जाधव, मृणाली वाघरे, याशना कदम, आकृती ठाकूर, आराध्या पवार, स्वरा बांबुलकर, मधुरा तळेकर, प्रभास गायकवाड, गणेश वलगुडे, सोहम कंसे.

**कांस्य पदक विजेते :-** आद्या खोचरे, उर्वी पांचाळ,परी गुरव,सावी लोके, ग्रिष्मा घाडीगांवकर, नील खामकर, देवांश झिंगाडे, सिद्धार्थ जाधव, श्लोक गायकवाड, आरुष गुरव, आराध्या कांबळे. तसेच **सहायक प्रशिक्षक** - सावी, ग्रिष्मा, नेत्रा, **स्मित.प्रमुख** प्रशिक्षक रोहित यांचे मार्गदर्शन लाभले.

## सुरक्षित केज; नागरिक आणि पोलीस एकत्र



**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.०३, केज (बीड) :** कर्तव्यदक्ष पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवने आणि त्यांचे सहकारी बाळासाहेब अहंकारे, काजी व इतरांनी रात्रीच्या गस्त (राऊंड) दरम्यान, शिक्षक कॉलनीतील नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने सुरू केलेल्या 'संध्याकाळच्या राऊंड' मध्ये सक्रिय सहभाग घेतला. साहेब म्हणाले: आम्ही सदैव तुमच्या सोबत आहोत! यावेळी, पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवने साहेबांनी नागरिकांच्या या सतर्क उपक्रमाचे मनःपूर्वक अभिनंदन केले आणि नागरिकांना 'आपले पोलीस दल तुमच्या सुरक्षेसाठी २४७ तत्पर आहे' असा आश्वासक शब्द दिला. यावेळी शिक्षक कॉलनी भागातील पत्रकार प्रकाश मुंडे,पिटू भैया तांदळे, रवि घुले,गोटू पाळवदे, अमोल मुंडे, मोहसीन शेख, शशिकांत ढाकणे, घुले व इतर नागरीक राऊंड ला होते.कृतव्यदक्ष पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवने साहेब यांचे केजवासीयांना कळकळीचे आवाहन!सुरक्षित केजसाठी नागरिक-पोलीस सहकार्य अत्यावश्यक आहे. इतर भागातील नागरिकांनी: शिक्षक कॉलनीतील नागरिकांप्रमाणेच आपल्या भागात 'रात्रीचे/ संध्याकाळचे राऊंड' सुरू करावेत. सतर्क राहा: परिसरातील अनोळखी व्यक्ती/वाहनांची माहिती त्वरित पोलिसांना द्या. पोलीस आणि नागरिक, एक मजबूत सुरक्षा साखळी!

# मतदानोत्तर चाचण्यांच्या निष्कर्षांना २० डिसेंबरपर्यंत बंदी

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०३, मुंबई :** राज्यातील सर्व २८८ नगरपरिषदा व नगरपंचायतींची मतमोजणी २१ डिसेंबर २०२५ रोजी करण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला आहे. त्याचबरोबर मतदानोत्तर चाचण्यांचे निष्कर्षही २० डिसेंबर २०२५ रोजी मतदान समाप्तीच्या अर्ध्या तासापर्यंत जाहीर करता येणार नाहीत, असेही न्यायालयाच्या आदेशात नमूद केले आहे. न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाने ही संबंधित सर्व जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश दिले आहेत.

मतदान यंत्रांची हाताळणी काळजीपूर्वक करण्यात यावी. मतदान यंत्र ठेवण्यात आलेल्या गोदामांसाठी २४ तास चोख सुरक्षा व्यवस्था तैनात करावी. सुरक्षा उपकरणे (उदा. गोदामाच्या प्रवेद्वाराबाहेरील सीसीटीव्ही, सुरक्षा आलार्म सिस्टीम, अग्निशमन यंत्रणा इ.) व्यवस्थित कार्यान्वित असल्याची खात्री करून घ्यावी. राजकीय पक्षांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधींना गोदामांबाबत आणि तिथल्या सुरक्षा व्यवस्थेबाबत अवगत करावे. त्याचबरोबर निवडणूक लढविणारे उमेदवार अथवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधींना गोदामाचे द्वारे दिसेल अशा ठिकाणी बसण्यासाठी जागा निश्चित करून द्यावी, असेही निर्देश राज्य निवडणूक आयोगाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे.

राज्यातील २६४ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदान झाले; तसेच सुधारित निवडणूक कार्यक्रमानुसार २४ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या अध्यक्षपदांसह सर्व सदस्यपदांसाठी आणि ७६ नगरपरिषदा व नगरपंचायतींमधील १५४ सदस्यपदांच्या जागांसाठी २० डिसेंबर २०२५ रोजी मतदान होणार आहे. या सर्व ठिकाणी आता २१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजेपासून मतमोजणी सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# कर्ज माफीसाठी पूर्व तयारी सुरू; सोसायट्यांकडून थकबाकीदार शेतकर्यांकडे कागदपत्रांची मागणी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, अहिल्यानगर :** नगर तालुक्यात विविध गावात सहकारी सोसायट्यांनी थकबाकीदार शेतकर्यांकडून विविध कागदपत्रांची पूर्तता करण्याच्या सुचना केल्या आहेत. कर्जमाफीच्या पूर्व तयारीचा हा भाग असल्याचे सांगण्यात आले. लवकरात लवकर थकबाकीदार शेतकर्यांनी त्यांच्याकडे असणार्या कर्जाच्या तपशीलासह अन्य कागदपत्रे सोसायटी पातळीवर जमा करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहे. राज्य सरकारच्यावतीने जून २०२६ पर्यंत कर्जमाफीची प्रक्रिया राबवण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आलेली आहे.

दरम्यान, राज्यातील शेतकर्यांना कर्जमाफी देण्यासाठी सहकार आयुक्त दीपक तावरे यांच्या अध्यक्षतेखाली समिती कार्यकरत असून या समितीने सहकारी बँकांमार्फत तालुका व गावपातळीवर असणार्या सहकार सोसायट्या मार्फत कर्जदार शेतकर्यांच्या विविध माहिती मागवली आहे. यात कर्जासाठी गहाण दिलेला सातबारा ७/१२ झेरॉक्स प्रत, कर्जदार शेतकर्यांचे आधार कार्ड झेराक्स प्रत, फार्मर आयडी, पॅन कार्ड, सेव्हिंग पासबुक झेरॉक्स प्रत, कर्जखाते के.सी. सी. झेरॉक्स प्रत, मोबाईल क्रमांक लिंक असलेला, तसेच मुळ कर्जदार मयत असल्यास तर त्यांच्या वारसदार नेमुन स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र या कागदपत्रे संबंधीत गावातील सहकारी संस्थेच्या सचिवांकडे स्व प्रमाणीत जमा करावी.

यामुळे सोसायट्यांना कर्जदार शेतकर्यांची माहिती संकनल करता येणार आहे. संबंधीत शेतकर्यांचे सेव्हिंग खाते किंवा कर्ज खात्याची केवायसी नसल्याने नव्याने खाते उघडण्यात यावे, शेतकर्यांना अडचण असल्यास त्यांनी त्यांच्या सोसायाटी सचिवांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

नगर तालुक्यातील अनेक गावात अशा प्रकारे कर्जदार शेतकऱ्यांकडून माहिती संकलित करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. याबाबत जिल्हा बँकेशी संपर्क साधला असता त्यांनी राज्य पातळीवरील कर्जमाफीसाठी समितीने याबाबतच्या सूचना दिल्याने कर्जदार शेतकऱ्यांची माहिती संकलित करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.

# नगरपालिका, नगरपंचायत निवडणुकीत ६२.९७ टक्के मतदान

## बल्लारपूर नगरपालिकेत सर्वात कमी, तर भिसी नगरपंचायतमध्ये सर्वाधिक मतदानाची टक्केवारी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०३, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यात मंगळवार, दि.०२ डिसेंबर २०२५ रोजी पार पडलेल्या बल्लारपूर, भद्रावती, ब्रम्हपुरी, चिमूर, गडचांदूर, मुल, नागभीड, राजुरा, वरोरा या नगरपालिकेत व भिसी नगरपंचायत निवडणुकीत सरासरी ६२.९७ टक्के मतदान झाले. यामध्ये जिल्ह्यात सर्वात मोठी नगरपालिका असलेल्या बल्लारपूर मध्ये सर्वात कमी ५५.३१ टक्के, तर सर्वाधिक मतदान भिसी नगरपंचायत मध्ये ८२.१९ टक्के झाले.

जिल्ह्यातील ९ नगरपालिका व एका नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक दरम्यान एकूण ३ लाख ३९ हजार ४९ मतदारांपैकी २ लाख १३ हजार ४९१ मतदारांनी मताधिकार बजावला आहे. आता सर्वांचे लक्ष २१ डिसेंबर रोजी लागणाऱ्या निवडणूक निकालाकडे लागले आहे. बल्लारपूर नगरपालिकेत एकूण ८३ हजार ८२१ मतदारांपैकी ४६ हजार ३६० मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे.

यामध्ये २३ हजार ६२९ पुरुष व २२ हजार ७३१ महिला मतदारांचा समावेश असून मतदानाची टक्केवारी ५५.३१ टक्के इतकी आहे. भद्रावती मध्ये एकूण ५२ हजार ५७२ मतदारांपैकी ३१ हजार ८३६ मतदारांनी मतदान केले. येथे १६ हजार १७६ पुरुष व १५ हजार ६६० महिलांनी मताधिकार बजावला असून मतदानाची टक्केवारी ६०.५६ इतकी ठरली आहे. ब्रम्हपुरी मध्ये एकूण ३३ हजार ७७९ मतदारांपैकी २२ हजार ९३६ मतदारांनी मतदानाचा हक्क पार पाडला. येथील मतदानाची टक्केवारी ६७.९० इतकी असून ११ हजार ३८५ पुरुष व ११ हजार ५५१ महिलांनी मतदान केले आहे.

चिमूर मध्ये २२ हजार ५५७ मतदारांपैकी १६ हजार २६७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला असून यात ८ हजार ३३९ पुरुष व ७ हजार ९२८ महिला मतदारांचा समावेश आहे. येथील मतदानाची टक्केवारी ७२.१२ इतकी आहे. गडचांदूर मध्ये एकूण २४ हजार ४५७ मतदारांपैकी १४ हजार ५५२ मतदारांनी मतदान केले. येथील मतदानाची टक्केवारी ५९.५० इतकी आहे. मुल नगरपालिकेत एकूण २१ हजार ७४५ मतदारांपैकी १४ हजार ८०३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

यात ७ हजार ३६९ पुरुष व ७ हजार ४३३ महिला मतदारांचा समावेश आहे. येथील मतदानाची टक्केवारी ६८.०८ इतकी आहे. नागभीड मध्ये एकूण २० हजार ९९२ मतदारांपैकी १६ हजार ४८५ मतदारांनी मतदान केले. यात ८ हजार १७९ पुरुष व ८ हजार ३०६ महिला मतदारांचा समावेश आहे. येथे मतदानाची टक्केवारी ७८.५३ इतकी आहे. राजुरा नगरपालिकेत एकूण २६ हजार ८५५ मतदारांपैकी १६ हजार ५९७ मतदारांनी मताधिकार अधिकार पार पाडला. येथे ८ हजार ५९७ पुरुष व ८ हजार महिला मतदारांचा समावेश असून मतदानाची टक्केवारी ६१.८० इतकी आहे. वरोरा नगरपालिकेत एकूण ४३ हजार ३२९ मतदारांपैकी २६ हजार ३०६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे.

यामध्ये १३ हजार २५४ पुरुष व १३ हजार ५१ महिला मतदारांची संख्या आहे. येथील मतदानाची टक्केवारी ६०.७१ इतकी आहे. एकमेव भिसी नगरपंचायत मध्ये एकूण ८ हजार ९४२ मतदारांपैकी ७ हजार ३४९ मतदारांनी मताधिकार पार पाडला आहे. यात ३ हजार ७४५ पुरुष व ३ हजार ६०४ महिला मतदारांचा समावेश आहे. येथे मतदानाची टक्केवारी सर्वाधिक ८२.१९ इतकी आहे.

# खा.धानोरकर यांचा शिक्षण मंत्रालयावर हल्लाबोल

## रिक्त पदांवर केंद्र सरकारने हात झटकले



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०३, चंद्रपूर :** महाराष्ट्रामधील शालेय शिक्षणाची विदारक स्थिती आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याशी होत असलेला खेळ आज लोकसभेत उघड झाला. खासदार प्रतिभा धानोरकर यांनी शिक्षण मंत्रालयाला धारेवर धरत राज्यातील शिक्षणाच्या गंभीर प्रश्नांवर तातडीने लेखी उत्तर मागितले. खासदार प्रतिभा धानोरकर यांनी थेट विचारणा केली की, महाराष्ट्रातील तब्बल ८,१८७ शाळा फक्त एकाच शिक्षकांवर चालत आहेत हे सत्य आहे काय? तसेच या शाळांमधील रिक्त पदांमुळे शिक्षण गुणवत्तेचा बळी जात असताना, शिक्षण मंत्रालयाकडे या रिक्त जागा भरण्यासाठी कोणती ठोस कालमर्यादा आहे? त्यांनी राष्ट्रीय शिक्षण धोरणाचे, विद्यार्थी - शिक्षक गुणोत्तर, पायदळी तुडवणाऱ्या शाळांवर सरकार कोणती कठोर कारवाई करणार आहे, असा जाब विचारला. विशेषत: राज्यातील आदिवासी आणि दुर्गम भागांमध्ये एकाच शिक्षकांवर चालणाऱ्या शाळांमुळे विद्यार्थ्यांचे कसे नुकसान होत आहे, यावर सरकारने कोणते जिल्हावार सर्वेक्षण केले आहे, याचे तपशील देण्याची मागणी त्यांनी केली आहे.

या गंभीर प्रश्नांवर शिक्षण राज्यमंत्री जयंत चौधरी यांनी समाधानकारक उत्तर देणे टाळले. मंत्रालयाने' शिक्षण हा समवर्ती सूचीतील विषय आहे' असे सांगत शाळांचे नियमन व शिक्षकांच्या सेवाशर्ती राज्य सरकारच्या अखत्यारीत असल्याचे स्पष्ट केले. रिक्त पदांबाबत बोलताना, सरकारने 'शिक्षकांची भरती ही सेवानिवृत्ती आणि राजीनाम्यामुळे सतत चालणारी प्रक्रिया आहे' असे हात झटकणारे विधान केले. केंद्र सरकार फक्त राज्यांशी पाठपुरावा करत आहे आणि वेळोवेळी सूचना देत आहे. 'समग्र शिक्षा' योजनेअंतर्गत केंद्र सरकार केवळ एकत्रित निधी पुरवते, पण या निधीचा उपयोग राज्य सरकारांनी करायचा असतो, असे सांगून केंद्राने आपली जबाबदारी झटकल्याचे चित्र आहे. खा. प्रतिभा धानोरकर यांनी उपस्थित केलेल्या या प्रश्नामुळे, महाराष्ट्रातील गरीब आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांचे भविष्य, केवळ कागदी घोडे नाचविणाऱ्या सरकारी धोरणांमुळे अधारात असल्याचे पुन्हा एकदा सिध्द झाले आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न ' समवर्ती सूची' च्या नावाखाली राज्या- राज्यांमध्ये टोलवला जात असल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

## मुरबाड येथे जागतिक अपंग दिन उत्साहात साजरा

**अक्षराज : अक्षय गिरा**

**दि.०३, मुरबाड (ठाणे) :** प्रहार अपंग क्रांती संघटना, मुरबाड तालुका यांच्यावतीने आयोजित जागतिक अपंग दिन २०२५ कार्यक्रम दिनांक ०३ डिसेंबर २०२५ रोजी माऊली गार्डन हॉल, मुरबाड येथे मोठ्या उत्साहात पार पडला. दिव्यांग बांधवांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते तसेच जेवणाचीही उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. कार्यक्रमाला मिळालेला प्रतिसाद लक्षणीय होता. हा उपक्रम प्रहार ठाणे जिल्हा अध्यक्ष (ग्रामीण) किसन भंडारी व स्थानिक पदाधिकारी यांच्या पुढाकाराने यशस्वीरीत्या पार पडला. दिव्यांग बांधवांसाठी समाजहिताचे असे उपक्रम सातत्याने राबविणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. कार्यक्रमास ठाणे जिल्हा अध्यक्ष स्वप्नील पाटील, प्रहार शहापूर तालुका अध्यक्ष वसंत पानसरे, सल्लागार घनशाम




परदेशी, सल्लागार रामचंद्र मडके, प्रवक्ते विनायक बोद्रे, संघटक विजय हरणे, युवा संघटक मयूर किरपण तसेच इतर मान्यवरांची उपस्थिती लाभली.

## महापरिनिर्वाण दिनाच्या पार्श्वभूमीवर चंद्रपूर जिल्ह्यात ४ ते ७ डिसेंबरपर्यंत कलम ३६ लागू

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०३, चंद्रपूर :** जिल्ह्यात ६ डिसेंबर रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन पाळण्यात येत असल्याने कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने दिनांक ४ डिसेंबरच्या मध्यरात्रीपासून ७ डिसेंबरच्या मध्यरात्रीपर्यंत कलम ३६ चे पोटकलम अ ते फ लागू करण्यात आले आहे. या अंतर्गत महाराष्ट्र पोलिस कायद्यान्वये खालील नमुद केल्याप्रमाणे सार्वजनिक ठिकाणी वागणुकीबाबत, वाद्य वाजविणेबाबत, सभेचे आयोजन, मिरवणुक काढण्याबाबत त्या ठिकाणी रस्ते निश्चित करण्याबाबत, लाऊडस्पिकर वापरण्याबाबत योग्य निर्बंध व निर्देश देण्याचे अधिकार सर्व पोलिस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याना देण्यात आले आहे. यात अ) मिरवणुक व सभेच्या ठिकाणी त्यातील लोकांचे वागणुकीबाबत योग्य निर्देश देण्याचे अधिकार, ब) मिरवणुकीचा रस्ता व वेळ निर्धारीत करणे तसेच धार्मिक पुजास्थानाच्या जवळ लोकांचे वागणुकीचे निर्बंध घालण्याचे अधिकार, क) मिरवणुकीस बाधा होणार नाही, याबाबतचे आदेश, ड) सार्वजनिक रस्त्यावर तसेच सार्वजनिक ठिकाणी वाद्य वाजविणे, गाणी गाणे, ढोल ताशे वाजविणे इत्यादीचे निर्बंध घालण्याचे अधिकार, इ) रस्ते व इतर सार्वजनिक ठिकाणी सुव्यवस्था ठेवण्यासाठी निर्देश देण्याचे अधिकार, ई) सार्वजनिक रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी लाऊडस्पिकर वाजविण्यावर निर्बंध तसेच मर्यादा घालण्याचे अधिकार, फ) कलम ३३, ३५, ३७ ते ४०, ४२, ४३ व ४५ मुंबई पोलिस अधिनियमान्वये काढण्यात आलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याचे व सुचना देण्याचे अधिकार. सदर आदेश लागू असताना सभा, मिरवणुकीत वाद्य वाजविणे, लाऊडस्पिकर वाजविणे, मिरवणुकीत नारे लावणे, मिरवणुकीचा रस्ता व वेळ निर्धारीत करण्यासाठी संबंधित ठाणे अंमलदार यांची परवानगी घेण्यात यावी. सर्व बाबतीत पोलिस ठाणे प्रभारी अधिकारी तसेच त्यांच्यापेक्षा कनिष्ठ दर्जाचे सर्व पोलिस अधिकारी यांनी दिलेल्या निर्देशाचे पालन करणे. सदर आदेश दिनांक ४ डिसेंबरच्या मध्यरात्रीपासून ७ डिसेंबरच्या मध्यरात्रीपर्यंत अंमलात राहील, असे जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशात नमुद आहे.

## श्री.मतोबा महाराजांच्या मूर्ती व दानपेटीची चोरी; संतप्त ग्रामस्थांकडून नैताळे बंद

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०३, विंचूर (नाशिक) :** नाशिक – छत्रपती संभाजीनगर महामार्गावर असलेल्या व महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असणाऱ्या श्री.मतोबा महाराजांच्या मूर्ती व दानपेटीची चोरी झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. संतप्त ग्रामस्थांनी स्वयंस्फूर्तीने नैताळे बंद ठेवून निषेध नोंदवला आहे. दिनांक ३ डिसेंबर रोजी पहाटे २.४५ च्या सुमारास दोन अज्ञात चोरट्यांनी आतील दरवाजाची कुलूप तोडून मंदिरात प्रवेश केला.

श्री.मतोबा महाराजांच्या चांदीच्या सुमारे तीन किलो वजनाच्या दोन मूर्ती व दानपेटी चोरून नेली. पहाटेच्या सुमारास सदर चोरीची घटना पुजाऱ्याच्या लक्षात येताच त्यांनी सदर घटनेची माहिती देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष नामदेव बोरगुडे व विश्वस्त मंडळास दिली. अध्यक्ष नामदेव बोरगुडे यांनी स्वतः निफाड पोलिस ठाण्यात जाऊन चोरीची तक्रार दाखल केली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता निफाड पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक गणेश गुरव टीमसह घटनास्थळी दाखल झाले.




मंदिर व परिसरातील सी.सी.टी.व्ही फुटेज तपासले असता दोन युवकांनी चोरी केल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर तातडीने नाशिक येथील श्वान पथकास पाचारण करण्यात आले. श्वान पथकाने गाव परिसर व धारणगाव रस्त्यापर्यंत दिशा दाखवली. श्वान पथकाच्या मदतीने आज दुपारी गावालगत असलेल्या गोविंदराव भवर यांच्या गट नंबर १६३ मधील शेतात असलेल्या विहीरीत रिकामी दानपेटी सापडली आहे. त्यानंतर फॉरेन्सिक टीमही तपासात सामील झाली. सदर घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थ व परिसरातील भाविक नैताळे येथे जमा झाले. ग्रामस्थांनी स्वयंस्फूर्तीने गाव बंद ठेऊन निषेध व्यक्त केला. जोपर्यंत पोलिस चोरट्यांना शोधून कठोर कारवाई करत नाहीत तोपर्यंत संपूर्ण नैताळे शहर स्वयंस्फूर्तीने बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

> श्री.मातोबा महाराज मूर्ती चोरीमुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. ग्रामस्थांनी शहर व परिसरात पूर्णपणे शांतता प्रस्थापित करून व्यावसायिकांनी स्वयंस्फूर्तीने संपूर्ण दुकाने बंद ठेवून निषेध नोंदवला आहे. पोलिसांनी ग्रामस्थांच्या संयमाचा आदर करून तातडीने तपास करावा.
> **- राजेंद्र बोरगुडे (संचालक, लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती)**

दरम्यान या घटनेची माहीती मिळाल्याने निफाडचे आमदार दिलीपराव बनकर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष राजेंद्र डोखळे, सागर पाटील कुंदे, निफाडचे तहसीलदार विशाल नाईकवाडे, तलाठी शंकर खडांगळे, ग्रामविकास अधिकारी उज्वला भोईर यांनी घटनास्थळी भेट दिली. लाखो भाविकांच्या श्रद्धास्थानाचा असा अवमान सहन केला जाणार नाही असा इशारा देत ग्रामस्थांनी शांतता राखावी व पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे अशी विनंती आमदार दिलीप बनकर यांनी केली. दरवर्षी पौष पोर्णिमेला येथे अखंड १५ दिवसांसाठी यात्रोत्सव भरतो. या कालखंडात कालखंडात लाखो भाविक श्री.मतोबा महाराजांच्या चरणी नतमस्तक होतात, यात्रोत्सवासाठी अवघा एक महिना उरला असल्याने पोलिसांपुढे मोठे आव्हान ठाकले आहे.श्री.मतोबा महाराज मंदिरातील चोरीची ही दुसरी घटना आहे. या अगोदर दिनांक १७ फेब्रुवारी २००१ रोजी चोरट्यांनी मतोबा महाराजांची चांदीची मूर्ती, दोन चांदीच्या लहान मूर्ती, चांदीचे दोन नाग, एक घोडा, पितळेची कालभैरव मूर्ती असा अडीच किलो चांदीचा ऐवज चोरून नेला होता. दि.१० जून रोजी अचानक गावाच्या दक्षिण बाजूस गोविंद सदू खरे यांच्या शेतात त्यांचे नातू महेंद्र भास्कर खरे हे शेतीची मशागत करत असतांना प्लॅस्टिक कागदात गुंडाळलेली वस्तू वर आल्या. खरे यांनी प्लॅस्टिक कागद उचकून पाहिला असता त्यांना त्यात चोरीस गेलेली मतोबा महाराज मूर्ती दिसली.

## पुण्यातील कला संस्कार आर्ट स्टुडिओत तयार होणार चंद्रपूरातील शिवरायांचा अश्वारूढ पुतळा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०३, चंद्रपूर :** छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे लोकवर्गणीतून उभारण्यात येणार असलेल्या साडेबारा फूट उंचीच्या भव्य अश्वारूढ पुतळ्याच्या कामाला वेग आला आहे. हा पुतळा पुणे येथील प्रसिद्ध कला संस्कार आर्ट स्टुडिओ मध्ये तयार केला जाणार असून बुधवारी आ. किशोर जोरगेवार यांनी स्टुडिओला भेट देत प्रत्यक्ष कामाचा आढावा घेतला.

यावेळी स्टुडिओचे संस्थापक व संचालक महेंद्र थोपते यांच्यासोबत स्मारकाबाबत सविस्तर चर्चा झाली. छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवस्मारक उभारण्याची शिवप्रेमींची मागणी अनेक वर्षांपासून होत होती. ही भावना ओळखून आ. जोरगेवार यांनी स्वतः पुढाकार घेऊन महानगर पालिका प्रशासनासोबत बैठका घेत स्मारक उभारणीची प्रक्रिया गतीमान केली आहे. या संदर्भातील प्रशासकीय मंजुरींची बहुतेक कामे पूर्ण झाली असून उर्वरित तांत्रिक बाबी तातडीने निकाली काढण्याचे निर्देश त्यांनी महापालिका प्रशासनाला दिले आहेत. येथील जागा ५८ लक्ष रुपयात मापालिका प्रशासनाने जिल्हा प्रशासनाकडून विकत घेतली असून सदर पैसेही वर्ग करण्यात आले आहे. शिवस्मारकाची निर्मिती पुण्यातील कला संस्कार आर्ट स्टुडिओकडे सोपवावी, अशी शिवभक्तांची इच्छा होती. त्यानुसार सदर कला केंद्राला ५ लक्ष रुपयांची प्राथमिक रक्कम अदा करण्यात आली आहे.

आज झालेल्या भेटी दरम्यान स्मारकाची रूपरेषा, शिल्पाची गुणवत्ता,



### आ.जोरगेवार यांची कला केंद्राला भेट

वापरल्या जाणाऱ्या साहित्याची निवड आणि निर्मितीची वेळावधी याबाबत सखोल चर्चा आ. किशोर जोरगेवार यांनी केली आहे. थोपते यांच्या स्टुडिओने यापूर्वीही छत्रपती शिवाजी महाराज, स्वातंत्र्यवीर, संत-भगवंत तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भव्य स्मारके तयार केली आहेत. चंद्रपूरात उभारल्या जाणाऱ्या या साडेबारा फूट उंचीच्या भव्य अश्वारूढ पुतळ्यामुळे शहराचे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक सौंदर्य वाढणार असून शिवप्रेमींचे स्वप्न साकार होणार आहे, असे आ. किशोर जोरगेवार यांनी सांगितले.

## विकासाचं श्रेय मतदार संघातील सर्वसामान्य जनतेलाच - आ.दाते

### दैठणे गुंजाळ येथे ८० लाखांच्या विकासकामांचे भूमिपूजन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, पारनेर (अहिल्यानगर) :** मतदारसंघात होत असलेला विकास हा कोणत्याही एकाच व्यक्तीचा नव्हे, तर या मतदारसंघातील सर्वसामान्य जनतेच्या विश्वासाचा आणि सहकार्याचा परिपाक आहे. लोकशाही व्यवस्थेत नागरिकच लोकप्रतिनिधींना विकासाची संधी देतात. त्यामुळे आज होणाऱ्या प्रत्येक विकासकामाचे श्रेय हे माझ्या मतदार संघातील जनतेलाच आहे, असे मनोगत आमदार काशिनाथ दाते यांनी व्यक्त केले. दैठणे गुंजाळ येथे आमदार दाते यांच्या शुभहस्ते श्री खंडेश्वर देवस्थान भक्त निवास बांधणे –



१० लक्ष, श्री खंडेश्वर ते हिवरे बाजार रस्त्याला जोडणारा पाहोच रस्ता करणे – ५ लक्ष, रोहीदास नगर रस्ता काँक्रीटीकरण करणे – ७ लक्ष, ग्रामपंचायत कार्यालय विस्तारीकरण करणे – १० लक्ष, नामदेव गुंजाळ घर ते जि.प.प्रा. शाळा बंगला रस्ता काँक्रीटीकरण करणे – ४० लक्ष, रेणुका माता मंदीर रस्ता काँक्रीटीकरण करणे – ८ लक्ष रुपये अशा एकूण ८० लाख रुपयांच्या विविध विकासकामांच्या भूमिपूजनाचा शुभारंभ उत्साहात संपन्न झाला. रस्ते, पाणी व मूलभूत सुविधा मजबूत करण्याच्या उद्देशाने हाती घेतलेल्या या कामांमुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. कार्यक्रमास दैठणे गुंजाळ गावचे आजी–माजी पदाधिकारी, ग्रामस्थ, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विकासकामांच्या शुभारंभानंतर उपस्थित नागरिकांनी आमदार दाते यांच्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरल्याचे मत व्यक्त करत त्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

> दैठणे गुंजाळ गावासह संपूर्ण ढवळपुरी गटात आमदार दातेसर व जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून विकासकामांचा मोठा डोंगर उभा राहिला असून या भागातील जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याला ते सातत्याने प्राधान्य देत असतात. या गटातील जनतेच्या वतीने मी या दोनही नेतृत्वाचे आभार व्यक्त करतो.
> **– सुभाष दुधाडे, भाजपा जिल्हा सरचिटणीस**

पुढे बोलताना, आमदार दाते यांनी सांगितले की, पारनेर तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. प्रत्येक काम नियोजनपूर्वक व वेळेत पूर्ण करण्यासाठी संघटितपणे प्रयत्न सुरू आहेत. विधानसभा निवडणुकीच्या माध्यमातून जशी मला जनसेवा करण्याची संधी मला दिली तशीच एक संधी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या माध्यमातून महायुतीच्या समविचारी उमेदवारांना द्यावी, जेणेकरुन विकासाचा वेग वाढण्यास मदत होईल.

## थोडक्यात


### अत्याधुनिक एस.टी डेपो ची सर्व सोयीयुक्त इमारतीचे भूमिपूजन परिवहन मंत्री यांच्या हस्ते संपन्न



**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०३, मिरा भाईंदर :** मिरा–भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सुमारे ४० हजार मीटर जागेमधून सीआरझेडमुळे फक्त ७ हजार ४०० मीटरवर बांधकामास परवानगी मिळाल्यानंतर नव्या संकल्पनांचा आराखडा तयार करण्यात आला. या नवीन आराखड्यानुसार नवीन इमारतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानयुक्त परिवहन इत्यादी शिवसैनिक विभाग कार्यालय, कर्मचाऱ्यांसाठी विश्रांती गृह व सुरक्षित सुविधा, प्रशस्त बसविहार जागा उपलब्ध करून देण्यात येत आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून भाईंदर पश्चिम येथे खुल्या जागेवर मोठ्या संख्येने स्थानिक रहिवासी व्यवसाय करून रोजगार मिळवत आहेत. आता त्यांच्यासाठी आरक्षित जागेत प्रशस्थ असे मार्केट उभारण्यात येणार आहे. शहरातील पारंपरिक व्यवसायाला नवा श्वास देणारा हा महत्त्वपूर्ण निर्णय आहे.मिरा–भाईंदर शहराची वाढती लोकसंख्या आणि वाहनभार लक्षात घेता राज्यातील पहिलाच पीपीपी मॉडेलवर उभारला जाणारा बहुमजली पार्किंग प्लाझा येथे निर्माण होणार आहे. तसेच मार्केट यार्ड लगत जवळजवळ १०० दुचाकी आणि बेसमेंट मध्ये ७० चारचाकी वाहनांच्या पार्किंगची सुविधा नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामुळे शहरातील वाहतूक आणि पार्किंगच्या समस्येवरील ताण मोठ्या प्रमाणात कमी होईल. भाईंदर पश्चिमच्या मध्यवर्ती ठिकाणी उभा राहणारा हा प्रकल्प मिरा–भाईंदरच्या विकास प्रवासात सुविधा, सुरक्षितता, आधुनिकता आणि स्थानिक विकासाचा भक्कम संगम तसेच 'सुवर्णक्षण' ठरणार आहे. हा केवळ प्रकल्प नाही, हे मिरा–भाईंदरच्या उज्ज्वल भविष्यासाठी नवी दिशा आहे. २०२६ मध्ये पॉड टॅक्सी ही मिरा भाईंदर मे चालेल. देशातील सर्वात जास्त विकसित शहर म्हणून मिरा –भाईंदर शहराचे नाव व्हावे असा माझा संकल्प आहे. असे प्रतिपादन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक ने केले. कार्यक्रमास मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त राधा बिनोद शर्मा व डढ महामंडळाचे अधिकारी महाजन इतर सन्मानित अधिकारी तसेच कर्मचारी व शिवसेनेचे पक्ष संघटक निशा नार्वेकर, संजय मांजरेकर, कैलास पाटील, धनेश पाटील, श्रीमती आमगावकर, जितेश वोरा इत्यादी मोठया संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

### महाबळेश्वर टॅक्सी संघटनेच्या दत्त मंदिराचे भव्य उद्घाटन



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०३, महाबळेश्वर (सातारा) :** दिनांक ०४ डिसेंबर २०२५ रोजी टॅक्सी स्टॅण्ड महाबळेश्वर येथे नुतन श्री दत्त मंदिराचे प्राणप्रतिष्ठापणा, कलशारोहन व नूतन भव्य मंदिराचे उद्घाटन श्रीमंत उदयनराजे भोसले खासदार सातारा लोकसभा व मकरंद पाटील मदत व पुनवर्सन मंत्री मकरंद पाटील यांच्या हस्ते तसेच या कार्यक्रमास शंभूराज देसाई पालकमंत्री सातारा, खासदार नितीन पाटील तसेच आमदार शशिकांत शिंदे व इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. महाबळेश्वर स्थानिक टॅक्सी व्यवसायिक संघटने मध्ये हिंदू मुस्लिम बांधव एकत्रपणे मनोभावे नूतन दत्त मंदिराची उभारणी केली आहे. दरवर्षी दत्त जयंतीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम व भंडाऱ्याचे आयोजन केले जाते . यामध्ये हिंदू मुस्लिम बांधव मनोभावे भक्ताची सेवा करतात आयोजित केले. हिंदू–मुस्लीम ऐक्याचे प्रतीक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या स्थानिक टॅक्सी व्यावसायिक संघटनेने नव्या रूपात उभारलेल्या श्री दत्त मंदिराचा तीन दिवसीय प्राणप्रतिष्ठापना, कलशारोहण आणि भव्य उद्घाटन सोहळा यंदा उत्साहात पार पडणार आहे. महाबळेश्वर येथील स्थानिक टॅक्सी व्यवसायिक संघटना व देगीदार यांच्या प्रयत्नाने सुबक अस्या आर्कषक मंदिराचा जीर्णोद्धार पुर्ण केले आहे या उद्घाटन सोहळा कार्यक्रमास राजेंद्र राजपुरे, महाबळेश्वर नगरपालिकेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी योगेश पाटील, पोलीस निरक्षक बापूसाहेब सांडभोर , व इतर मान्यवर वारकरी सांप्रदाय मंडळ, देणगीदार, सामाजिक संस्थांचे पदाधिकारी आणि महाबळेश्वर तालुक्यातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या उद्घाटन कार्यक्रमास उपस्थित राहण्याकरिता अध्यक्ष यशवंत भिलारे, उपाध्यक्ष अकिल पटेल व जन सेक्रेटरी सी.डी बावळेकर व इतर संचालक मंडळ टॅकसी व्यवसायिक संघटना सभासद यांनी अवाहन केले आहे.

### भारतीय रिझर्व्ह बॅंकेने महाबळेश्वर अर्बन बॅंकेवरील सर्व निर्बंध केले शिथिल



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०३, महाबळेश्वर (सातारा) :** महाबळेश्वर तालुक्याची अर्थवाहिनी असलेली दि.महाबळेश्वर अर्बन को-ऑप बँक लि. महाबळेश्वरया बँकेवर भारतीय रिर्झव्ह बँकेने सुपरवायझरी ॲक्शन फ्रेमवर्क (SAF) नुसार लागु केलेले सर्व निर्बंध मागे घेतले आहेत. त्यामुळे गत चार वर्षापासून बंद असलेले तारणी कर्ज सभासदांसाठी सुरू करण्याचा महत्वाचा निर्णय नुकत्याच झालेल्या संचालक मंडळाचे सभेमध्ये घेणेत आला असल्याची माहिती बँकेचे चेअरमन समीरभाई सुतार यांनी दिली. अर्थिक वर्ष २०२४ -२०२५ अखेरचे भारतीय रिझर्व्ह बँकेकडुन तपासणी झाली असून व वैधानिक लेखापरिक्षण ही पुर्ण झालेले आहे.बँकेच्या अर्थिक स्थितीचा रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी आढावा घेवून गत ४ वर्ष लागू केलेले सर्व निर्बंध मागे घेतलेले आहेत. त्यामुळेच बँकेच्या संचालक मंडळाने कर्ज सुविधा सुरू करण्याचा निर्णय प्राधान्याने व तत्परतेने घेतलेला आहे. कर्जाची वेळेत व नियमितपणे परतफेड केलेल्या सभासदांनी सदर कर्ज सुविधेचा लाभ घ्यावा.

रिझर्व्ह बँकेच्या निर्देशांचे तंतोतंत पालन करून गेल्या चार वर्षपेक्षा जास्त काळ सर्वांच्या सहकार्याने बँकेचा कारभार पारदर्शक व सर्वसमावेशक कारभार सुरू आहे असाविश्वास व्यक्त केला आहे. सदर निर्णयाचे सर्व सभासद ठेवीदार हितचिंतक व ग्राहककांकडुन स्वागत करून संचालक मंडळाचे पेढे वाटून अभिनंदन करणेत आले. यावेळी उपाध्यक्ष शरद बावळेकर, संचालक राजेश कुंभारदरे, दत्तात्रय वाडकर, सतीष ओंबळे, चंद्रकांत बावळेकर, नदीम शारवान, संपत जाधव, उषा ओंबळे, मनिषा पारठे, जावेद वलगे, अनिलसाळुंखे, प्रशांत कात्रट, मिलींद ढेबे, विजयकुमार दस्तुरे व मुख्य व्यवस्थापक फकिर मोहमद वलगे व सेवक वर्ग उपस्थित होते.